

दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

गणपती बप्पा मोरया

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ९ • Title - Code :- MAHMAR4951 • शनिवार दि.२३ सप्टेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# भारताचा ऑस्ट्रेलियावर पाच विकेटने विजय

## पहिल्या सामन्यात भारताचा विजय ;राहुलचे चौकारांसह चौदावे अर्धशतक

**मोहाली । प्रतिनिधी**

आशिया कप विजेत्या भारतीय क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात ५ विकेटनी शानदार विजय मिळवला. आगामी आयसीसी वनडे वर्ल्डकपच्या आधी भारतीय संघाने जोरदार कामगिरी कायम ठेवली आहे. टीम इंडियाने गेल्या १० वर्षात आयसीसीच्या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले नाही हे मोठे आणि कटू सत्य आहे. पण याची दुसरी बाजू अशी देखील आहे की द्विपक्षीय मालिकेत भारतासमोर कोणीही असो त्याचा टिकाव लागत नाही. भारतीय संघाने सलग दोन वेळा ऑस्ट्रेलियाचा त्यांच्या घरच्या मैदानावर कसोटी मालिकेत पराभव केला होता. टी-२० आणि वनडे चॅम्पियन असलेल्या इंग्लंडला देखील अखेरच्या मालिकेत त्याच्या घरच्या मैदानात पराभूत केले होते. तेव्हा रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने कसोटी आणि टी-२० क्रमवारीत अव्वल स्थान मिळवले होते.आशिया कप चॅम्पियन टीम इंडियाने आता ऑस्ट्रेलियाचा पहिल्या वनडेत पराभव करून वनडे क्रमवारीत अव्वल स्थान मिळवले आहे. मोहालीत झालेल्या पहिल्या लढतीत मिळवलेल्या विजयासह टीम इंडियाने क्रिकेटमधील फॉर्मेटमध्ये अव्वल स्थान मिळवले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विजयानंतर भारताने वनडे क्रमवारीत पाकिस्तानला मागे टाकत पहिले स्थान मिळवले. भारताचे आता ११६ गुण झाले आहेत तर पाकिस्तान ११५ गुणांसह दुसऱ्या आणि ऑस्ट्रेलिया १११ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. आशिया कप स्पर्धा सुरू असताना ऑस्ट्रेलिया क्रमवारीत अव्वल स्थानी होता.संघांच्या क्रमवारीसोबत खेळाडूंच्या क्रमवारीत देखील टीम इंडियाच्या प्लेअरचा बोलबाला आहे. टी-२०च्या फलंदाजांच्या क्रमवारीत सूर्यकुमार यादव अव्वल स्थानी आहे. वनडे गोलंदाजांच्या क्रमवारीत मोहम्मद सिराज पहिल्या क्रमांकावर आहे. कसोटीत गोलंदाजांच्या क्रमवारीत आर अश्विन आणि ऑलराउंडर्सच्या क्रमवारीत रविंद्र जडेजा पहिल्या स्थानावर आहे. कोसटी फलंदाजांच्या क्रमवारीत शुभमन गिल दुसऱ्या स्थानावर तर टी-२० मध्ये ऑलराउंडरच्या क्रमवारीत हार्दिक पंड्या दुसऱ्या स्थानावर आहे.पहिल्या वनडेत ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत भारताला २७७ धावांचे लक्ष्य दिले होते. भारताकडून ऋतुराज गायकवाड आणि शुभमन गिल यांनी शतकी भागिदारी केली. त्यानंतर केएल राहुल आणि सूर्यकुमार यादव यांनी संघाला विजयाच्या जवळ पोहोचवले. गोलंदाजीत मोहम्मद शमीने ५ विकेट घेतल्या.



# आलापल्ली येथील मॅरेथॉन स्पर्धेत शेकडो स्पर्धकांचा सहभाग

## ‘प्रधानमंत्री स्कील फार रन’ चे आयोजन

**अहेरी । प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात पी एम स्किल रन मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आलापल्ली तथा जिमलगट्टा यांच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी आलापल्ली येथे प्राचार्य वैभव बोनगीरवार यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉन स्पर्धेत शेकडो स्पर्धकांनी सहभाग घेतला.स्पर्धेचे उद्घाटन अहेरी चे पोलीस निरीक्षक मनोज काळबांधे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून एपीआय व्ही. बी. चव्हाण, आलापल्ली ग्रामपंचायतचे सरपंच शंकर मेश्राम,सागर बिटीवार सामाजिक कार्यकर्ते, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष स्वप्नील श्रीरामवार आदी



मान्यवर उपस्थित होते.भव्य मॅरेथॉन स्पर्धेत विविध गावातील बहुतांश स्पर्धकांनी मोठ्या सहभाग घेतला होता. स्पर्धेत आलापल्ली आणि जिमलगट्टा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.विशेष म्हणजे शासकीय औद्योगिक संस्था, आलापल्ली तर्फे आयोजित मॅरेथॉन स्पर्धेसाठी राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या कडून स्पर्धकांना टी-शर्ट, ग्लुकोज, फराळ आदींची व्यवस्था करण्यात आली होती.तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जिमलगट्टाच्या मॅरेथॉन स्पर्धेसाठी माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांच्याकडून विविध ठिकाणी पिण्याचे पाणी व ग्लुकोज ची व्यवस्था करण्यात आली होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे गावंडे, व्ही.एस. तुमसरे, पी.ए. धुळसे,गोलू राजकोंडावार व इतर सर्व तासिका निदेशक वर्ग तसेच सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचारी, सफाईकामगार व सुरक्षा रक्षक व प्रशिक्षणार्थी समिती आदींनी परिश्रम घेतले.

### साई आयटीआयमध्ये विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

# २४ ला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक जुनी मनोहर टॉकीज परीसरात श्री.साई आयटीआय मध्ये आयएएस मिशन, स्पर्धा परीक्षाविषयक व तंत्रज्ञान क्षेत्रातील माहिती बरोबरच कृषी विषयक माहिती यावर तज्ज्ञ मंडळीचे मार्गदर्शनपर सेमिनार रविवार दिनांक २४ सप्टेंबरला सकाळी ११.३० वाजता आयोजन केले आहे. कार्यक्रमात मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख आय.ए.एस. मिशनचे प्रमुख तथा अमरावती अकॅडमीचे संचालक प्रा. डॉ .नरेशचंद्र काठोळे उपस्थित राहणार आहेत.प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य विकास आणि उद्योजकता नागपूर विभागाचे माजी सहाय्यक संचालक मिलिंद हांडे, कीटक शास्त्रज्ञ, कृषी तज्ज्ञ सल्लागार (आयबीएन लोकमत, साम टीव्ही, टीव्ही नाईन, झी २४ तास ,बीबीसी) विषयांतर्गत वृत्तवाहिनीवर प्रसारण असलेले मिलिंद राऊत शासकीय तांत्रिक विभागाचे सेवानिवृत्त निदेशक सुनील भुसे, प्रा. डॉ.चंद्रकिरण घाटे विविध मान्यवरांचे विषयाच्या अनुषंगाने





मार्गदर्शन लाभणार आहे .कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रोटरी क्लब तथा न.प.चे अध्यक्ष अनिल धानोरकर ,कार्यक्रमाचे मुख्य संयोजक , जनमंच सदस्य, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख रवींद्र तिराणिक उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमाचे आयोजनाकरिता रोटरी क्लब येथील पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत असून, भद्रावती शहरातील शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक श्री. साई आय.टी.आयचे संचालक तथा रोटरी क्लबचे प्रोजेक्ट हेड प्रमुख किशोर पत्तीवार यांनी केले आहे.

# अन्नत्याग आंदोलन करणाऱ्या रवींद्र टोंगे यांचीं प्रकृती चिंताजनक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ओबीसी बांधवांच्यां विविध समस्या घेउन रविंद्र टोंगे हे गेल्या ११ सप्टेंबरपासून अन्नत्याग आंदोलन करित आहेत. तब्बल बाराव्या दिवशीहीं सरकारने आंदोलनाची दखल घेतली नाही. दरम्यान २२ सप्टेंबरला आंदोलनकर्ते टोंगेंची तब्बेत खालावली होती. यामुळे त्यांना उपचारा साठी चंद्रपूर च्या मेडिकल कॉलेज मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले.

टोंगेना रुग्णालयात दाखल केल्यानंतर ओबीसी युवा महासंघाचे विजय बल्की हे उपोषणस्थळी बसले आहेत. २१ सप्टेंबरला पदाधिका-यांनी टोंगेंच्या समर्थनात नेत्याचे मुखवटे लावले व मुंडन आंदोलन व भिकमांगो केले होते.रविंद्र टोंगे यांच्या मागणीला समाजातून मोठा पांठिंबा मिळत असतांना सरकार मात्र अदयापही या आंदोलनाप्रती गंभीर झाले नसल्याचे चित्र आहे.ओबीसीच्या विविध मागण्यांना घेत रविंद्र टोंगे हे चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनास बसले आहेत.अन्नत्यागासारखे प्रभावी आंदोलन करणा-या टोंगेकडे मात्र शासन प्रशासनाचे लक्ष नाही. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणा-या जरांगे पाटील यांच्या आंदोलनात सत्ताधा-यासह विरोधी पक्ष व विविध नेत्यांनी हजेरी लावली टोंगे यांच्या आंदोलनाकडे मात्र अदयापही गंभीरतेने बघितल्या जात नसल्याने ओबीसी बांधवात तिव्र संताप आहे. टोंगेंच्या जिवाचे वाईट झाल्यास संपूर्ण राज्यात उद्रेक होईल, असा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाने दिला आहे. सरकारकडे ओबीसींचे ७२ वसतीगृह सुरू करण्यासाठी पैसे नाहीत हि मोठीच शोकांतिका आहे. आम्ही या सरकारचा निषेध करित असल्याचे ओबीसी महासंघांच्या पदाधिका-यांनी सांगितले. जोपर्यंत सरकार आमची दखल घेत नाही तोपर्यंत आंदोलनाची धग पेटत राहील असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी सांगितले. दरम्यान यां आंदोलनाला समाजातून मोठा पाठिंबा भेटत आहे.



# पावसाचा परतीचा प्रवास सोमवार पासून; हवामान विभागाचा अंदाज

नैऋत्य मोसमी पावसाचा वायव्य भारतातून परतीचा प्रवास सोमवार, २५ सप्टेंबरपासून सुरू होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. मोसमी पाऊस सामान्यपणे एक जूनपर्यंत केरळमध्ये दाखल होतो. आठ जुलैपर्यंत संपूर्ण देश व्यापतो आणि १७ सप्टेंबरच्या सुमारास वायव्य भारतातून माघार घेतो. १५ ऑक्टोबपर्यंत देशातून पूर्णपणे माघार घेतो. यंदा परतीचा प्रवास उशिराने सुरू होणार आहे. सोमवारी, २५ सप्टेबरपासून पश्चिम राजस्थानच्या काही भागातून नैऋत्य मोसमी पाऊस माघारी परतण्यासाठी पोषक स्थिती निर्माण होऊ शकते. परतीचा प्रवास लांबण्याची ही तेरावी वेळ आहे.यंदाच्या पावसाळय़ात २२ सप्टेंबपर्यंत देशात सरासरी ९४ टक्के पाऊस पडला आहे. देशात पावसाळय़ात सरासरी ८३२.४ मिमी पाऊस पडतो. यंदा प्रत्यक्षात ७८०.३ मिमी पाऊस पडला आहे. एल-निनोचा ऑगस्ट आणि सप्टेबर महिन्यांतील पावसावर विपरीत परिणाम झाल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे. जूनमध्ये देशात पाऊस सक्रिय झाला नाही. जुलैच्या अखेरीस देशभरात मोसमी पाऊस सक्रिय झाला. बंगालच्या उपसागरात सतत कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्यामुळे पावसाने सरासरी भरून काढली.

## शब्द वेध

### हा असा

हा असा बोलला
तो तसा बोलला..
हाड नसलेल्या जिभेवर
त्याने माणूस तोलला !
माणसाने माणसाचे नित्य
जाणावे रे मोल.....
शब्द तारी ..शब्द मारी
नित्य सांभाळावा तोल.....!!



सुभाष उसेवार

९०११२६२४३९

# वाघाच्या हल्लात शेतकरी ठार

## ताडाळा तुकुम शेतशिवारातील घटना

**मूल । प्रतिनिधी**

शेतामध्ये पाणी पाहण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यावर दबा धरून बसलेल्या वाघाने जागीच ठार केल्याची घटना शुक्रवारी सकाळी सात वाजता दरम्यान मूल तालुक्यातील मौजा ताडाळा तुकूम शेतशिवारात घडली.

सुर्यभाव टिकले वय ५५ वर्षे रा. चिचाळा असे वाघाच्या हल्लात ठार झालेल्या शेतकऱ्याचे नांव आहे.गेल्या दोन दिवसांपासुन मूल तालुक्यात मुसळधार पाऊस बरसल्याने संपुर्ण जनजीवन



विस्कळीत झालेले आहे. दरम्यान मूल तालुक्यातील चिचाळा येथील शेतकरी सुर्यभान टिकले यांनी मौजा ताडाळा तुकुम शेतशिवारातील शेतात पाणी पाहण्यासाठी गेले असता दबा धरून बसलेल्या वाघाने शेतकऱ्यावर झडप घेवुन जागीच ठार केले. नागरीकांना सदर घटनेबद्दल माहिती होताच घटनास्थळावर गर्दी केली होती. सदर घटना शुक्रवारी सकाळी ७ वाजता दरम्यान घडली. घटनास्थळावर वनविभागाचे अधिकारी ,कर्मचारी यांनी भेट देत पंचनामा केला . वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरीकांनी केली आहे.

# सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या-डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

सोयाबीन उत्पादक शेतक-ांना सरसकट पन्नास हजार रू. सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी केंद्रीय मानवाधिकार संगठनचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे यांनी महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना निवेदनाव्दारे केली आहे.



चंद्रपूर जिल्हयात खरीप हंगामात पडलेला पावसाचा खंड, उशिराने झालेली पेरणी, तसेच मोजाक आणि खोड अळी किंवा पांढरी माशी यांच्या प्रादुर्भावामुळे जिल्हयातील सोयाबीन पीक पूर्णतः नष्ट झाले असून चंद्रपूर जिल्हयातील शेतकरी संकटात सापडला आहे.सोयाबीन पिकांचे या हंगामात प्रचंड नुकसान झाले, पीक हाती येण्यापूर्वीच हे संकट उद्भवल्याने चंद्रपूर जिल्हयातील हजारो शेतक-यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच अनेक सामाजिक संस्था व राजकीय पक्षाच्या माध्यमातून नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी संभाव्य नुकसानीच्या २५ टक्के आगाऊ नुकसान भरपाई एक महिन्याच्या आत देण्याचे आदेश ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीला दिले आहे. परंतु ही नुकसान भरपाई विमाधारक शेतक-यांना अत्यंत अल्प असून जिल्हयातील सर्व शेतक-यांना सरसकट प्रती एकरी पन्नास हजार रू. नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी बांधवांकडून होत आहे.

# राजानं मारलं आणि पावसानं झोडपलं तक्रार कुणाकडे करायची?

## सोयाबीन पीक उत्पादकांची व्यथा




भारत हा कृषिप्रधान देश असला तरी येथील कायदे आणि व्यवस्था ही शेतकऱ्यांच्या बाजूने पूर्वीही नव्हती आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानंतर आजही नाही. एकीकडे या देशात जय जवान, जय किसान चा नारा दिला जातो आणि दुसरीकडे शेतकऱ्यांचे मरण हेच सरकारी धोरण या उक्तीप्रमाणे शेतकऱ्यांना वागवले जाते. विधानसभा व लोकसभा सभागृहात शेतकऱ्यांच्या हिताचा जयघोष करीत सत्तेत बसलेल्या लोकप्रतिनिधी आणि भाषणातून वेळोवेळी शेतकऱ्यांप्रती गळा फाटेपर्यंत ओरडणाऱ्या राजकारण्यांना शेतकऱ्यांचा ऐनवेळी विसर का पडतो?

यावरून हे सिद्ध होते की नेते कितीही ओरडले तरी शेतकऱ्यांचे व्यथा समजायला त्यांना फार काळ लागेल.

जावे ज्याच्या वंशा, तेव्हा कळे अशी मराठीत एक म्हण आहे. या म्हणीप्रमाणे शेतकऱ्यांच्या आयुष्यातील वणवण संपायला तयार नाही. स्वातंत्र्यपूर्वी परकीय सरकार होते आता स्वातंत्र्यानंतर आपले देशी सरकार आहे. शेतकरी हिताचा दावा करीत सत्तेत आल्यावर मायबाप सरकार शेतकऱ्यांना आर्थिक आपत्तीतून बाहेर काढले अशी अपेक्षा होती.परंतु विद्यमान परिस्थिती बघता असला विचार करणे म्हणजे मुंगेरीलाल के हसीन सपने या हिंदी मालिके प्रमाणे होत आहे. जे न्याय देऊ शकतात ते नेतेच ऐनवेळी शेतकऱ्यांकडे पाठ फिरवत असल्याने गरीब शेतकऱ्यांनी अपेक्षा तरी काय करायची. शेती आणि शेतकऱ्यांच्या नावावर मते मागायची, व्यासपीठावर शेतकऱ्यांचे पुत्र म्हणून भाषणे ठोकायची आणि निवडून आल्यावर हम आपके है कौन? याप्रमाणे वागायचे. ही स्वार्थी वृत्ती राजकारणात वाढत आहे.

शेतकऱ्यांचा केवळ मतांसाठी वापर करायचा हा धंदा झाला आहे.ज्यांच्या भरोशावर आपण निवडून येतो, ऐश्वर्यात जगतो.संकटकाळात ऐनवेळी त्यांच्याकडे पाठ फिरविणे या एवढी मोठी कृतघ्नता नाही. निवडणुकीपूर्वी घसा फाटेस्तोवर शेतकऱ्यांची काळजी घेऊ म्हणणारे लोकप्रतिनिधी निवडून गेल्यानंतर सर्रासपणे शेतकऱ्यांकडे पाठ फिरवतात. ही अवहेलना शेतकऱ्यांनी किती दिवस सहन करायची? नसेल जमत तर निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना आश्वासने देऊ नये. कुठलीही आश्वासन दिले तर ते पूर्णपणे पाळण्याची धमक पाहिजे हा एक नैतिक नियम आहे. पण अलीकडे राजकारणात सगळीकडेच अनैतिकता पसरली आहे. याला जबाबदार कोण? आपली लोकशाही आज अमृत महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत आहे. आता तरी राजकारण्यांनी दिलेल्या वचनांची पूर्तता होणे अपेक्षित आहे. हे सगळे आठवण्याचे कारण म्हणजे विदर्भात सोयाबीन पिकांवर आलेले बुरशीजन्य रोग व त्यामुळे उध्वस्त झालेले पीक. पिकांचा विमा ज्या विमा कंपन्यांनी काढला त्यांची पंचनामे करण्यास केलेली टाळाटाळ. यामुळे शेतकरी हवालदील झालेले आहेत .शेतकऱ्यांना एक रुपयांत पीक विमा काढून मिळाला. शासनानेही एकरी अकराशे ते बाराशे रुपये कंपनीकडे भरून आपले दायित्व निभावले. पण जेव्हा बुरशीजन्य रोगांमुळे सोयाबीन पीक संकटात आले तेव्हा शेतकऱ्यांच्या पाठीशी सहानुभूतीने उभे राहून मदतीचा हात पुढे करण्याऐवजी आपले हात झटकण्याचा केलेला प्रयत्न लाजिरवाणा आहे. पीक विमा काल्यानंतर त्या पिकाचे नुकसान झाले असेल तर ते देण्याची जबाबदारी संबंधित विमा कंपन्यांची आहे.कारण त्यांनी पैसे घेऊन बांधिलकी स्विकारली आहे. त्यासाठी पंचनामे करण्याचे काम शासकीय यंत्रणा वा पीक विमा कंपन्यांचे आहे. परंतु या संकटाच्या वेळी ऐनवेळी विमा कंपन्यांनी पंचनामे करण्यास केलेली टाळाटाळ ही ए प्रकारे आपली जबाबदारी टाळण्याचाच प्रकार आहे. शेतात ई-पिक पाहणीसाठी २५ सप्टेंबर ही तारीख दिलेली आहे. शेतकऱ्यांनी ही माहिती स्वतः अपलोड करावी अशी विमा कंपनीची अपेक्षा आहे. परंतु अनेक शेतकऱ्यांकडे मोबाईल नाही. मोबाईल असेल तर नेटवर्क नाही.नेटवर्क असेल तर मोबाईलमध्ये पैसे नाही.पैसे असले तरी अनेक शेतकऱ्यांना मोबाईल कसा हाताळावा? याचे ज्ञान नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडून पिकाची माहिती पुरविणे अशक्य आहे. अडाणी आणि अज्ञानी शेतकरी वेळेच्या आत पीक माहिती उपलब्ध



करून देऊ शकणार नाही . त्यांनी मुदतीत माहिती दिली नाही म्हणून त्यांना आर्थिक मदतीला मुकावे लागेल.असे होऊ नये म्हणून महसूल विभागाने पुढाकार घेतला पाहिजे. पटवाऱ्याने स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामा करणे अपेक्षित आहे. त्यांनी पिकांचे पंचनामे करून ही माहिती शासनाला सादर करावी. नोकरशाहीने प्रामाणिकपणे गरजवंत शेतकऱ्यांच्या पाठीशी अशा संकटकाळी उभे राहून त्यांना मदत करणे अपेक्षित आहे. परंतु तसे होताना दिसत नसेल तर शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरून आपली व्यथा मांडावी लागते यासारखे लोकशाहीचे दुर्दैव नाही.

शेतातील पिकांवर अवलंबून असणारा शेतकरी राजा शेतातील सुस्थितीत पिके पाहून वर्षभराची रंगीबेरंगी स्वप्ने रंगवतो. दिवाळी आपल्या परीवारासोबत बऱ्यापैकी साजरी करीन अशी आशा धरतो. पण सोयाबीन पिकावर आलेल्या एका बुरशीजन्य रोगांमुळे सारी स्वप्ने एका रात्रीत करपून जातात.काय करावे त्या शेतकऱ्यांने. पावसानं झोडलं व राजाने मारल तर तक्रार कुणाकडे करायची? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. सोयाबीन पिक हातात येण्याच्या मार्गावर असताना ऐन कापणीच्या वेळी

आलेल्या बुरशीजन्य रोगामुळे सोयाबीनचे पीक उद्ध्वस्त झाले. सोयाबीनचे शेत संपूर्ण वाळले आहे. बुरशीजन्य रोगाने आक्रमण केल्यामुळे संपूर्ण पीक उभ्याउभ्या वाळायला लागले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कधी न भरून निघणारे आर्थिक नुकसान झाले. हा रोग रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी त्यांच्यापरीने प्रयत्न केले परंतु अपयश आले.

खरे म्हणजे शेती हा तोट्याचाच व्यवसाय आहे. शेतकऱ्याला शासन प्रतिक्विंटल ५ हजार रुपये सोयाबीनला भाव देतो. तो भाव त्रोटक आहे. शेतीच्या उत्पादनावर आधारित भाव देणे अपेक्षित आहे. परंतु मिळणारा भाव अतिशय अत्यल्प असल्याने शेती व्यवसाय तोट्यात चालणार आहे याची लोकप्रतिनिधींना आणि सरकारला कल्पना नाही का? या व्यवसायाचे प्रती एकर विश्लेषण करायचे झाल्यास आपणं सविस्तर हिशोब काढू म्हणजे शेती कशी तोट्यात आहे हे लक्षात येईल.

एका एकराचा ठेका १० हजार रुपये, नांगरणी ३ हजार रुपये, रोटॅव्हेटर १५०० रुपये, पेरणी १५०० रुपये, सोयाबीन थैली खरेदी ४ हजार रुपये, ट्रीटमेंट १ हजार रुपये, स्प्रे ३ हजार रुपये, कापणी ३ हजार रुपये, क्रेशींग ४०० रुपये प्रती एकर हा सोयाबीन उत्पन्नाचा खर्च एकत्र जोडल्यास जवळपास पंचवीस हजार रुपये प्रती एकर खर्च सोयाबीन उत्पादकांना लागतो. त्यामध्ये शेतकऱ्यांचे शेतात जाणे येणे वेगळे, स्वतः घरच्या बाईचे आणि मालकाचे शेतात काम करणे वेगळे, शेतावर काम करणाऱ्या नोकर व रोजगाराचे पैसे वेगळे. शेतात राहणाऱ्या बैलांचा चारा, शेतात वापरणाऱ्या अवजारांचा घसारा हा सगळा हिशोब काढला तर शासनाकडून सोयाबीनला मिळणारे ५ हजार रुपये प्रती क्विंटल भाव अत्यल्प आहे.न परवडणारा आहे. या भावामुळे शेतकऱ्यांचे शंभराचे सव्वाशे होण्याऐवजी शंभराचे साठच करणारा असल्यामुळे शेती व्यवसाय हा कमालीचा नुकसानीचा आहे. त्यामुळे शेतकरी संघटना शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या भावावर आधारित भाव मिळाला पाहिजे अशी मागणी करायची. हा उत्पन्नावर आधारित भाव मिळाला तर सोयाबीनला प्रती क्विंटल ८ ते ९ हजार रुपये भाव मिळणे अपेक्षित आहे. हा भाव मिळाला तर जवळपास शेतकऱ्यांचे वजा अधिक गणित सारखे राहील. जिथे ९ हजार रुपये भाव अपेक्षित आहे तिथे जर ५ हजार रुपये मिळणार असेल तर शेतकऱ्यांचे अर्थकारण चालणार कसे? शेतीचे अर्थकारण चालणार कसे? सततच्या तोटयामुळे शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना मग आत्महत्या कराव्या लागल्या तर नवल काय? शेती हा व्यवसाय जगामध्ये असा आहे की तो नेहमी नुकसानीमध्येच चालतो. मायबाप सरकारने शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून या गोष्टीकडे लक्ष घालून शेतकऱ्यांना वाजवी भाव कसा मिळेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अनेक पक्ष आणि संघटना शेतकऱ्यांच्या हिताचा दावा करतातही. परंतु शेतकऱ्यांच्या संकटाच्या वेळी कुठलाही नेता धावायला तयार नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा जवळील नंदोरी या लहानशा खेड्यातील नरेंद्र जिवतोडे यांनी ट्रॅक्टर रॅली आंदोलन करून शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नाला वाचा फोडण्याचा केलेला प्रयत्न कौतुकास्पद आहे. या आंदोलनाने जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले. या आंदोलनात वरोरा येथून ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या नंदोरी या गावातून ट्रॅक्टरसह शेतकऱ्यांनी पायदळ चालत जाऊन तालुका प्रशासनाला धारेवर धरले. नरेंद्र जिवतोडे यांचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे. शेतकऱ्यांना आशा दाखवणारा आहे. या निमित्ताने शेतकऱ्यांना एकत्रित करून त्यांचा आवाज बुलंद करून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला. या आद्रोलनातून शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन पीक विम्याचा प्रश्न जरी ऐरणीवर आला असला तरी शेती व्यवसायातील विदारक वास्तवही पुढे आले आहे. या आंदोलनाने शासनाकडून व विमा कंपन्यांकडून चाललेला अन्याय कमी होईल अशी अपेक्षा करायची का?

# मोदी आवास घरकुल योजना

सर्वांसाठी घरे-२०२४ हे शासनाचे धोरण असून, त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना सन २०२४ पर्यंत स्वत:चे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न शासनाचा आहे. त्यानुसार राज्यात ग्रामीण भागातील बेघरांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येत आहेत.


शासनामार्फत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुल योजनाचा लाभ देण्यासाठी रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदीम आवास योजना तसेच विमुक्त जाती भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व धनगर आवास योजना आहेत. तथापि, इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्याकरीता अशा प्रकारची कोणतीही योजना अस्तित्वात नव्हती त्यामुळे इतर मागास प्रवर्गातील घरकुलास पात्र लाभार्थी वंचित राहत होते. यामुळे राज्य शासनाने सन २०२३-२०२४ या वर्षांचा अर्थसंकल्प सादर करतांना राज्यात इतर मागास वर्गासाठी ३ वर्षांत १० लाख घरे पूर्ण करण्यासाठी 'मोदी आवास घरकुल योजना' सुरु करण्याची घोषणा केली आहे. त्याअनुषंगाने इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी येत्या तीन वर्षांत १० लाख घरे बांधण्यासाठी नवीन 'मोदी आवास घरकुल योजना' राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

आशी आहे योजना

राज्यात ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील आवास प्लस मधील प्रतिक्षा यादीत नाव असलेले लाभार्थी, आवास प्लस प्रणालीवर नोंद झालेले परंतु ऑटोमॅटीक सिस्टिमद्वारे रद्द झालेले पात्र लाभार्थी, जिल्हा निवड समितीने शिफारस केलेले लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

वरील नमूद मधून उपलब्ध झालेल्या इतर मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थींना नवीन घर बांधण्यासाठी अथवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रुपांतर करण्यासाठी १ लाख २० हजार अर्थसहाय्य देण्यात येईल. लाभार्थींना किमान २६९ चौ. फूट इतके क्षेत्रफळाचे बांधकाम करणे आवश्यक असेल.

इतर मागास प्रवर्गातील निवड झालेल्या लाभार्थींना प्राधान्यक्रमानुसार ग्रामसभेमार्फत



निवड करण्यात येवून लाभार्थ्यांची छाननी तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांचे मार्फत करुन घरकुलाचे प्रस्ताव जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत निकषानुसार लाभार्थींना निवड केली जाईल.

अशी असेल लाभार्थी पात्रता

लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील इतर मागास प्रवर्गातील असावा.

लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्ष असावे.

लाथार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु.१ लाख २० हजार पेक्षा जास्त नसावे.

लाभार्थ्यांचे स्वत:च्या अथवा कुटूंबियाच्या मालकीचे राज्यात पक्के घर नसावे.

लाभार्थ्यांकडे स्वत:ची अथवा शासनाने दिलेली जमीन असणे आवश्यक आहे अथवा त्यांचे स्वत:चे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधता येईल.

लाभार्थी कुटूंबाने महाराष्ट्र राज्यात अन्यत्र कोठेही शासनाच्या कोणत्याही गृहनिर्माण गृहकर्ज योजनांचा लाभ घेतलेला नसावा.


एकदा लाभ घेतल्यानंतर लाभार्थी पुन्हा योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.

लाभार्थी हा प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गतच्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट नसावा.

आवश्यक कागदपत्रे

सातबारा उतारा, मालमत्ता नोंदपत्र, ग्रामपंचायतमधील मालमत्ता नोंदवहीतील उतारा अथवा अथवा ग्रामपंचायत प्रमाणपत्र, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, आधारकार्ड, स्वेच्छेने दिलेल्या आधारकार्डची प्रत, रेशनकार्ड, निवडणुक ओळखपत्र, विद्युत बिल, मनरेगा जॉब कार्ड लाभार्थींच्या स्वत:च्या नावे वापरात असलेल्या बचत खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत.प्राधान्यक्षेत्र लाभार्थींची यादी करतांना ग्रामसभेने घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा, परितक्त्या महिला, कुटूंब प्रमुख, पूरग्रस्त क्षेत्रामधील लाभार्थी अथवा पिडीत लाभार्थी, जातीय दंगलीमुळे घराचे नुकसान (आग व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती, नैसर्गिक आपत्तीबाधीत व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती उद्दिष्टाच्या किमान ५ टक्के उद्दिष्ट दिव्यांगाकरीता राखीव ठेवणे आवश्यक आहे. इतर पात्र कुटुंबे यांना ग्रामसभेने प्राधान्य क्षेत्र देण्यात येणार आहे. घराच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार राज्य व्यवस्थापक कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून ठरवून दिलेले बांधकाम पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे निधी लाभार्थींच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येईल.घरकुल योजनेंतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या डोंगराळ, दुर्गम भाग क्षेत्रामध्ये घरकुल बांधकामाकरीता प्रति घरकुल १.३० लक्ष व सर्वसाधारण क्षेत्राकरीता प्रति घरकुल १.२० लक्ष अर्थसहाय्य देय राहील. तसेच प्रधानमंत्री आवास योजना, ग्रामीण योजनेप्रमाणे ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना मनरेगा अंतर्गत अनुज्ञेय असलेले अनुदान ९०/९५ दिवस अकुशल मजुरीच्या स्वरुपात अभिसरणाद्वारे अनुज्ञेय राहील. तसेच शौचालय बांधकामासाठी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत देय असलेले १२ हजार प्रोत्साहनपर अनुदानास देखील लाभार्थी पात्र असेल. इतर मागास प्रवर्गातील ज्या पात्र लाभार्थ्यांकडे घरकुल बांधकामाकरिता स्वत:ची जागा उपलब्ध नाही. असे लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, याकरीता सदर लाभार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतर्गत ५०० चौ.फुट जागेपर्यत ५० हजार पर्यंत अनुदान देय राहील. तसेच इतर मागास प्रवर्गा व्यतिरिक्त अन्य प्रवर्गातील पात्र लाभार्थी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतंर्गत प्रचलित असलेल्या तरतुदीनुसार लाभ मिळण्यास पात्र असेल

# २३ सप्टेंबर ला विषुव दिन परंतु दिवस-रात्र समान नसणार







दर वर्षी २१/२२ मार्च तसेच २२/२३ सप्टेंबर ला विषुव दिन असतो, म्हणजे सूर्य अगदी विषुव वृतांवर असतो परंतु आपल्या कडे उत्तर गोलार्धात २३ सप्टेंबर ला दिवस रात्र समान नसते.पाठ्य पुस्तके आणि सर्वसामान्य माहिती प्रमाणे २३ सप्टेंबर ला दिवस रात्र समान असतात असे मानले जाते ते वैद्न्यानिक दृष्टीने चुकीचे आहे ते बदलले पाहिजे असे खगोल अभ्यासक प्रा सुरेश चोपणे ह्यानी सांगितले आहे.

प्रा.सुरेश चोपणे
खगोल अभ्यासक,चंद्रपुर
मो.९८२२३६४४७३

पृथ्वी सूर्याकडे २३.५ अंशाने कललेली असल्याने वर्षभर पृथ्वी च्या २३.५ अक्षांसावर उत्तर-दक्षिणेला दर रोज जागा बदलताना दिसतो.ह्याला क्रांती वृत्त म्हणतो. सूर्याच्या कर्कवृत्ता वरून मकर वृत्ता कडे जाण्याच्या भासमान मार्गाला दक्षिणायन आणि मकर ते कर्क वृत्ताकडे जाण्याचा मार्गाला उत्तरायण म्हणत असतो.ह्या दोन्ही मार्गक्रमनावेळी सूर्य २१/२२ मार्च आणि २२/२३ सप्टेंबर ला दोनदा विषुव वृत्त पार करीत असतो,त्या दिवसांना विषुव दिन/संपात दिन(एर्क्विळपे) म्हटले जाते.२०२३ ला विषुव दिन २३ सप्टेंबर ला दुपारी १२.२० वाजता आहे.आपण ह्याच दिवशीं दिवस रात्र समान असते असे म्हणत असतो परंतु खगोलीय आणि भौगोलिक दृष्ट्या ते चुकीचे आहे.ह्या दिवशीं जगात सर्वत्र दिवस रात्र समान नसते.(१२ तासाचा दिवस आणि १२ तासाची रात्र)

उत्तर गोलार्धात आपल्या कडे २३ सप्टेंबर नंतर वेगवेगळ्या ठिकाणी ,वेगवेगळ्या दिवशी दिवस रात्र समान असते.पृथ्वी गोल असल्याने आणि प्रकाश वक्रीकरणामुळे हे दिवस वेगळे असतात.

कोणत्या तारखेला दिवस रात्र समान

उतर गोलार्धात ६० अक्षांसावर २५ सप्टेंबर ला ,४० अक्षांसावर २६ सप्टेंबर,३० अक्षांसा वर २७ सप्टेंबर,२० अक्षांसा वर २८ सप्टेंबर,१५ अक्षांसा वर ३० सप्टेंबर ला,१० अक्षांसा वर ४ ऑक्टोबर ला दिवस-रात्र समान असते.

महाराष्ट्रात केव्हा-कुठे दिवस-रात्र समान?

खरं तर महाराष्ट्रात अक्षांसा नुसार २८-३० सप्टेंबरला दिवस रात्र समान असेल.२३ सप्टेंबर ला महाराष्ट्रात कुठेच दिवस रात्र समान नसते.२३ तारखे ला मुंबई येथे १२.०४ ३६ तासाचा दिवस तर ११.५३.३४ तासाची रात्र असते. नागपूर येथे १२.०४.४१ तासाचा दिवस तर ११.५३.३३ तासाची रात्र असते,चंद्रपुर येथे १२.०४.३९ तासाचा दिवस तर ११.५५.३३तासाची रात्र असते.

२८ सप्टेंबर रोजी- नागपूर, अमरावती, वर्धा, अकोला,धुळे,जळगाव येथे दिवस रात्र समान

२९ सप्टेंबर रोजी -मुंबई,पुणे, नाशिक,चंद्रपुर, सातारा,सोलापूर येथे दिवस रात्र समान

३० सप्टेंबर रोजी -कोल्हापूर,रत्नागिरी येथे दिवस रात्र समान असेल



पिंपरी चिंचवड (पुणे ३३) येथील उमेश येनपुरे यांच्याकडील महालक्ष्मी पूजन सोहळा



सुरक्षा नगर, भद्रावती येथील प्रवीण पांडे यांच्या घरी महालक्ष्मी पूजन सोहळा



भद्रावती येथील वसंतराव मार्कंडे यांच्याकडील महालक्ष्मी पूजन.वर्षे १३ वे




वरोरा नगर परिषद चे माजी नगरसेवक दिनेश यादव यांच्या निवासस्थानी ज्येष्ठा गौरी पूजन



भद्रावती येथील लोकशिक्षण सेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांतजी गुंडावार यांच्या घरचे महालक्ष्मी पूजन. वर्षे ६७



सोनाली अशोक गायकवाड शिंदे नगर यांच्या निवासस्थानी ज्येष्ठा गौरी (महालक्ष्मी) पूजन




माजी नगरसेवक पंकज नाशिककर यांच्या निवासस्थानी ज्येष्ठा गौरी (महालक्ष्मी) पूजन

# सर्वधर्मीय ऐकतेसाठीच सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात–ना.मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

घुग्घुस येथील जय श्रीराम गणेश मंडळ व देवराव भोंगळे मित्रपरिवाराच्या वतीने गुरुवार, २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी गांधी चौकात सर्वधर्म समभाव महाआरती उत्साहात संपन्न झाली.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वने, मत्स्य व्यवसाय व सांस्कृतिक कार्य मंत्री महाराष्ट्र व पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी जि. प. अध्यक्ष देवराव भोंगळे, वणी क्षेत्राचे क्षेत्रीय महाप्रबंध आभास सिंग, पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, मुख्याधिकारी जितेंद्र गादेवार, भाजपचे निरीक्षण तांड्रा, संजय तिवारी व हिंदु समाजाचे प्रेमलाल पारधी, मधुकर मालेकर, नीलकंठ नांदे, रामचंद्र डोंगरे, राजू मानमोडे, पुंडलिक खनके, संजय भोंगळे, गजानन चिंचोलकर, प्रदीप कोरडे, मुस्लिम समाजाचे हनीफ शेख, रज्जाक शेख, हसन शेख, मकसूद शेख, मोमीन शेख, मकसूद अहमद, इस्माईल शेख, असगर खान, बौद्ध समाजाचे रामचंद्र चंदनखेडे, प्रवीण सोदारी, हेमंत पाझारे, बबलू सातपुते, सचिन कोंडावार, दिलीप कांबळे, अरुण रामटेके, इसाई समाजाचे शामसुंदर नायडू, रमेश नातर, संदीप आरमुला, आनंद गुंडेटी, सागर तांड्रा, व सिख समाजाचे सरदार संमत सिंग, जतींदर दारी, गुरुमीत सिंग, गुरपाल सिंग, अशोक मदान प्रतिनिधी उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री गणेशाची महाआरती करण्यात आली तसेच उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.याप्रसंगी बोलतांना ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, घुग्घुस शहरातील महाआरती ही सर्वधर्मीय ऐकतेचे प्रतीक आहे. घुग्घुस हे औद्योगिक शहर असून सर्व जाती धर्माचे लोक गुन्यागोविंदाने राहतात याचा प्रत्यय सर्वधर्म समभाव महाआरतीच्या माध्यमातून येत आहे. शहरात विविध राज्याचे लोक राहतात व सार्वजनिक कार्यक्रमात सहभाग नोंदविला घुग्घुस शहराने राज्यातील जनतेला आदर्श दिला. घुग्घुस शहराने अनेक वर्षांपासून तीच प्रथा परंपरा कायम ठेवली आहे.यावेळी मोठया संख्येत नागरिक उपस्थित होते.

# अजित पवार गटाकडून आमदारांना ब्लॅकमेलिंग–रोहित पवार

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार आणि शरद पवार यांच्यापैकी कोणाकडे जास्त संख्याबळ याची चर्चा रंगली आहे. मात्र, आता निवडणूक आयोगात सुनावणी सुरू झाल्याने याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. त्यातच शरद पवार गटातील आणखी एका खासदाराने आणि आमदाराने अजित पवार यांना पाठिंबा दिल्याची माहिती समोर आली आहे. यावरुन राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार गटावर निशाणा साधला आहे. अजित पवार गटाकडून आमदारांना ब्लॅकमेलिंग केली जात असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे.शरद पवार गटाचे एक आमदार आणि खासदार अजित पवार गटात जाण्याबाबत रोहित पवारांनी गंभीर आरोप केला आहे. काही नेत्यांना ब्लॅकमेलिंग केले जात असल्याचे रोहित



पवार यांनी म्हटले आहे. सही कर नाहीतर अमुक अमुक काम होणार नाही, अशी धमकीही दिली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एक खासदार आणि एक आमदार अजित पवार गटात खरच गेला का? हे पाहावे लागणार असल्याचे ते म्हणाले. आमदारांचे एखादे महत्त्वाचे काम त्याने प्रतिज्ञापत्र दिल्याशिवाय केले जात नसल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे.शरद पवार गटातील आमदारांनी पक्ष विरोधी कृत्य केल्यामुळे या आमदारांना आपत्र करण्यात यावे, अशी मागणी करत अजित पवार गटाने विधीमंडळाच्या अध्यक्षांकडे याचिका दाखल केली आहे. त्यावरही आमदार रोहित पवार यांनी मत व्यक्त केले आहे. रोहित पवार म्हणाले की, काल विधानसभा अध्यक्ष दिल्लीला कायदेशीर सल्ला घेण्यासाठी गेले होते. तिथूनच त्यांनी अजित पवार गटाला फोन केला असेल आणि त्यानंतर हे करण्यात आले असेल. त्यांची ती रणनिती असेल आम्ही आम्ही कारवाई करत आहोत. हा लढा कोर्टात जाईल आणि विजय आमचा होईल, असा दावा देखील आमदार रोहित पवार यांनी केला.

# दादासाहेब काळे विभागीय अध्यक्षपदी तर राष्ट्रीय संघटक पदी अरुण चव्हाण देशमुख

**फुलंब्री । प्रतिनिधी**

: महाराष्ट्र राज्यासह भारतातील एकूण २१ राज्यात सतत वीस वर्षापेक्षा जास्त काळापासून सर्वसामान्यांच्या हक्कासाठी व स्वातंत्र सैनिकाच्या सन्मानासाठी कार्य करणाऱ्या आणि भ्रष्टाचार निर्मूलनासाठी लढा देणाऱ्या अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या विभागीय अध्यक्षपदी दादासाहेब काळे तर अरुण चव्हाण देशमुख राष्ट्रीय संघटक या पदांवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यांचा लातूर संपन्न झालेल्या १३ व्या अधिवेशनात सन्मानपत्र व नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला .भारत सरकार दिल्ली नोंदणीकृत अशी व भारतातील स्वातंत्र्य सैनिक मराठवाडा मुक्ती संग्रामातील सैनिक व त्यांचे पाल्य आणि कुटुंब यांच्या हिताचे रक्षण करत त्यांना सामाजिक मदतीसाठी झटणाऱ्या व अपंग निराधार व वृद्धांच्या हक्कांसाठी जवळपास वीस वर्षापासून लढणाऱ्या अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली २१ राज्यात कार्यरत अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली . यावेळी या १३ व्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी प्रमुख पाहुणे माननीय खासदार सुधाकरजी शुरंगारे (खासदार लातूर ? कार्यक्रमाचे विशेष अतिथी मा . संजीव ( जनरल पोलीस ऑफ पोलिस कमिशनर सीआरपीएफ ) प्रमुख पाहुणे रवींद्र येळूनकर अध्यक्ष अखिल भारतीय स्वतंत्र सेनानी ( नवी दिल्ली ) कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर राष्ट्रीय अध्यक्ष त्यांच्या उपस्थितीत देशातील व राज्यातील अनेक पदाधिकारी यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली व समितीचे ध्येय धोरण ठरविण्यात आले आणि अरुण चव्हाण देशमुख व दादासाहेब काळे त्यांचे वर्षभरातील कार्य बघून राष्ट्रीय कोर कमिटीने त्यांना अरुण चव्हाण देशमुख यांची प्रदेशाध्यक्ष पदावरून बढती देत राष्ट्रीय संघटक या पदावर नियुक्ती दिली तर पत्रकार दादासाहेब काळे यांना जिल्हाध्यक्ष पदावरून बढती देत विभागीय अध्यक्ष ( छत्रपती संभाजी नगर , जालना , बीड जिल्हा ) या पदावर नियुक्ती केली छत्रपती संभाजीनगर जालना बीड या तीन जिल्ह्याच्या



विभागासाठी विभागीय अध्यक्ष म्हणून पत्रकार दादासाहेब काळे यांची १७ सप्टेंबर रोजी नियुक्ती करण्यात आली . राष्ट्रीय अध्यक्ष प्रदिप बाबा पाटील खंडापुरकर , प्रदेश अध्यक्ष पंडीतराव तिडके , राष्ट्रीय संघटक अरुण चव्हाण देशमुख, महिला प्रदेश अध्यक्षा राणी ताई स्वामी यांच्या हस्ते दादासाहेब काळे यांना यापूर्वीच्या कार्यासाठी गौरव पत्र देऊन सन्मानित करण्यात आले . आसाम , ओडीसा , पंजाब , दिल्ली , बिहार राज्याच्या प्रमुखां सह राष्ट्रीय कार्यकारणीच्या उपस्थितीत त्यांना नियुक्ती देण्यात आली . अरुण चव्हाण देशमुख राष्ट्रीय संघटक , सो . अंजनाताई राजपूत जिल्हाध्यक्ष महिला आघाडी ( संभाजी नगर )गोकुळसिंग राजपुत ( विभागीय सरचिटणीस ) सुनिल वैद्य ( छत्रपती संभाजीनगर सचिव ) , अंकुशराव डहाके ( जिल्हा संपर्क प्रमुख बुलढाणा ) कृष्णा लहाने देशमुख (जाफराबाद तालुका अध्यक्ष ) , बालासाहेब देशमुख , ( भोकरदन तालुका अध्यक्ष ) कदम पाटील , (जाफराबाद तालुका उपअध्यक्ष ) सुनील उंबरकर ( भोकरदन तालुका उपाध्यक्ष ) संजय जटाळे तालुकाध्यक्ष ( जामनेर )यांच्या सह महाराष्ट्र राज्यातील सर्व महिला पुरुष व सर्व आघाड्यांचे पदाधिकारी उपस्थित होते सुनिल वैद्य , इम्रान खान , कपिल जी जैस्वाल , सुधाकर जेठे , संपादक इस्माईल खान , अमोल कोलते , रमेश नेटके , साजिद पठाण , अजिंक्य काथार , सुरेश बोकील , पत्रकार आजम पठाण , राहुल सोनवणे , मधुकर खमाट , सादिक पठाण , लियाकत भाई , इनुस पठाण , सुरेश बोर्डे , दिलीप गवळी , इजियास पठाण , शिवाजी बनसोड , यांच्यासह छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील अनेकांनी भ्रमणध्वनीच्या माध्यमातून व प्रत्यक्ष भेटून दादासाहेब काळे व अरुण चव्हाण देशमुख यांचे अभिनंदन केले आहे .

## पदाधिकारी निवडीवरून पंढरपूर राष्ट्रवादीत नाराजी

# पक्षाध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे तक्रार करणार

**पंढरपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पंढरपूर शहर आणि तालुका पदाधिकारी निवडी वादाच्या भोवऱ्यात अडकल्या आहेत. नूतन पदाधिकारी निवडताना विद्यमान पदाधिकारी आणि तालुका पातळीवरील नेत्यांना विश्वासात न घेताच या निवडी करण्यात आल्या आहेत असा आरोप करून पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर भोसले, कार्याध्यक्ष रणजित पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय बाबर, प्रसिद्धी प्रमुख विजय काळे, रशीद शेख,गिरीश चाकोते, विजय गायकवाड, सचिन सोलंकी, कपिल कदम,दत्तात्रय माने आदी उपस्थित होते.

यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुधीर भोसले यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले कि, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पंढरपूर तालुका, शहर अध्यक्ष पदाच्या निवडी झाल्याचे वृत्त समाज माध्यम आणि वर्तमान पत्रातील बातम्या वरून समजले. या निवडी बद्दल आमचा आक्षेप नाही. परंतु या निवडी करीत असताना



राष्ट्रवादीचे नेते युवराज पाटील, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष गणेश पाटील आणि आम्ही पदाधिकारी यांना कसलीही कल्पना दिलेली नाही. आम्हाला न विचारता, न विश्वासात घेताच या निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत. या निवडीमुळे निष्ठावान कार्यकर्त्यामध्ये नाराजी पसरली आहे. जिल्हाध्यक्षांकडे तक्रार वास्ताविक पाहता आम्ही स्थापनेपासून पक्षाशी निष्ठावान आहोत, अडचणीच्या काळात पक्षासोबत राहिलो, पवार साहेबांच्या पाठीशी आहोत. असे असताना हि आम्हाला विश्वासात न घेताच नूतन पदाधिकारी नियुक्त केले आहेत. या निवडी संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांच्याकडे तक्रार केली आहे. तसेच आता पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेऊन या निवडी बद्दल तक्रार करणार आहोत,असाही इशारा दिला आहे.

# करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचालींना वेग

**करमाळा । प्रतिनिधी**

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू असून दोन दिवसात १२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची चर्चा सध्या सुरू आहे.करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती वरती बाजार समितीच्या स्थापनेपासून जगताप गटाचे वर्चस्व राहिले आहे. मागील पंचवार्षिक निवडणुकीत सभापती शिवाजी बंडगर यांनी बंडखोरी केल्याने जगताप गटाची सत्ता गेली होती. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीची मागील पंचवार्षिक निवडणूक राज्यभर गाजली होती. या पंचवार्षिक निवडणुकीत पुन्हा एकदा जगताप गटाची सत्ता येण्यासाठी सर्व गटाच्या नेतेमंडळींनी समंजस्याची भूमिका घेण्याचा घेण्याच्या मार्गावर असल्याची सध्या तालुक्यात चर्चा असून त्या दृष्टीने हालचाली सुरू असल्याचे बोलले जात आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये आमदार रणजितसिंहमोहिते पाटील यांनी पुढाकार घेतले असल्याचेही सांगण्यात येत आहे. माजी आमदार तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती जयवंतराव जगताप, माजी आमदार नारायण पाटील , बागल गटाचे नेते दिग्विजय बागल यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी मोहिते पाटील प्रयत्न करत असल्याचे समजले आहे.

# घरपट्टे मिळण्यापासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही-ना.सुधीर मुनगंटीवार

## मूल येथे ११६ लाभार्थ्यांना घराचे पट्टे वाटप

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून शासकीय जमिनीवर वास्तव्य असलेल्या कुटुंबाना घरपट्टे देऊन नियमानुकूल करणे, हे शासनाचे धोरण आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीत घरपट्टे वाटपाचा श्रीगणेशा २१ जुलैला मूल येथून करण्यात आला आहे. जिल्ह्यात सर्वत्र ही मोहीम टप्प्याटप्प्याने राबविण्याच्या सुचना प्रशासनाला दिल्या असून कोणताही पात्र लाभार्थी यापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली




मूल तहसील कार्यालय व नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पात्र नागरिकांना घरांचे पट्टे वाटप करतांना ते बोलत होते. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संध्याताई गुरुनुले,मूलचे उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार डॉ. रविंद्र होळी, न.प. मुख्याधिकारी यशवंत पवार, माजी न.प.अध्यक्ष रत्नमाला भोयर, भाजपा शहर अध्यक्ष प्रभाकर भोयर,नंदू रणदिवे,चंद्रकांत आष्टनकर, महेंद्र करताडे, अनिल साखरकर, मिलिंद खोब्रागडे,ओंकार ठाकरे आदी उपस्थित होते. पट्टे हे महसूलच्या जमिनीवरच देता येतात. वन, रेल्वे, संरक्षण विभागाच्या जमिनीवरील पट्टे देता येत नाही, असे सांगून पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी जमिनीचा पट्टा नावावर असणे आवश्यक आहे. जिल्ह्यात आवास योजनेचा आढावा घेतला असता, अनेकांकडे घरपट्टेच नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे जिल्ह्यात मिशन मोडवर योग्य व पात्र व्यक्तिंना घरपट्टे वाटपाची मोहीम हाती घेण्यात आली आहे. आपल्या जिल्ह्यात रमाई आवास योजनेमध्ये लाभार्थ्यांची संख्या कमी व घरकुलांची संख्या जास्त आहे. शबरी आवास योजनेअंतर्गत निकषाच्या तरतुदीनुसार पूर्तता करीत असेल त्यांना घरकुल देण्यात येईल. आतापर्यंत ओबीसी प्रवर्गाकरीता घरकुल कमी होते. आता मात्र नमो आवास योजनेंतर्गत राज्यात ३ वर्षात १० हजार घरे बांधण्यात येणार आहे, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

**मूल येथे विकासाची गंगा :** मूल येथे भव्यदिव्य नाट्यगृह बांधण्यात आले असून या भागात रस्ते, स्टेडीयम, जीम, उद्यान, वीज पुरवठा व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, विद्यार्थ्यांसाठी डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी अभ्यासिका आदी विकासकामे करण्यात आली आहे. या भागात विकासाची जवळपास २०० कामे पूर्ण करण्यात आली आहे. अपूर्ण असलेली कामेसुध्दा लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. मूल येथे १०० बेडेड ग्रामीण रुग्णालय अत्याधुनिक व सर्व सोयीयुक्त करण्यात येईल.

**या कुटुंबाला मिळाले घरांचे पट्टे :** पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते गजानन शेडमाके व अंजली शेडमाके, बेबी कोकोडे, शांता जेंगठे, रविंद्र जेंगठे व रेखा जेंगठे, आनंद मोहुर्ले व श्वेता मोहुर्ले, शंभु मडावी व मालन मडावी, शामराव वडलकोंडावार व ताराबाई वडलकोंडावार, हरीदास मेश्राम व गिता मेश्राम यांना घरपट्टे प्रमाणपत्र देण्यात आले.

**अधिकारी व पदाधिका-यांनी योजना जनतेपर्यंत पोहचवाव्या :** राज्य सरकार जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे. गोरगरिबांच्या कल्याणकारी योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहचल्या पाहिजे. यासाठी शासकीय अधिकारी / कर्मचारी तसेच पदाधिका-यांनी विशेष लक्ष द्यावे. शासन जनेतसाठी काम करीत असतांना अधिका-यांनी विनाकारण अडवणूक करू नये, अशा सुचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

## गुणवत्तापूर्ण व दर्जेदार विकास कामामुळेच जिल्ह्याचा नावलौकिक-पालकमंत्री मुनगंटीवार





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागपूर - चंद्रपूर मार्गावरील लखमापूर हनुमान मंदिर परिसर हा अध्यात्मिक ऊर्जा देणारा परिसर आहे. या परिसराच्या सौंदर्यकरणासाठी ६० लक्ष रुपये मंजूर करण्यात आले होते, या परिसरातील अतिशय चांगले कामे झालेली आहे. शेवटी गुणवत्तापूर्ण व दर्जेदार कामांमुळेच जिल्ह्याचा नावलौकिक वाढतो, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

लखमापूर येथे हनुमान मंदिर परिसर सौंदर्यीकरणाचे लोकार्पण व नवीन पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवराव भोंगळे,भाजपा नेते रामपाल सिंग, हनुमान काकडे, सरपंच शारदा राजूरकर, उपसरपंच प्रभाकर ताजने, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष अनिल डोंगरे, विलास टेंभुने, नामदेव आसुटकर, हेमा रायपूरे, फारुख शेख, हनुमान मंदिर देवस्थानचे अध्यक्ष सुरेश शर्मा, शांताराम चौखे, मनोज मानकर आदी मान्यवर उपस्थित होते.मंदिर परिसराच्या सौंदर्यीकरणाची मागणी हनुमान मंदिर देवस्थानचे अध्यक्ष . शर्मा आणि त्यांच्या टीमने केली होती, असे सांगून पालकमंत्री ना .मुनगंटीवार म्हणाले, नागरिकांची ही मागणी तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांना सांगितली व त्यांनी मंदिर परिसराच्या सौंदर्यीकरणासाठी ६० लाख रुपये तात्काळ मंजूर केले. लखमापूर येथील हनुमानजीचे मंदिर हे अधिक सुंदर व आकर्षक होण्यासाठी आणखी काही कामे शिल्लक असल्यास निधी मागणीचा प्रस्ताव सादर करावा. मंदिरासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली. पुढे ते म्हणाले, आज येथे नवीन पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन करण्यात आले असून यासाठी १ कोटी ६२ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहे. गावात आपण पिढ्यानपिढ्या राहत आलो आहोत. त्यामुळे पाण्याच्या टाकीचे काम उत्तम व दर्जेदार व्हावे, याकडे गावकऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. कामे दर्जेदार असली तरच आपला परिसर, गाव, शहर व जिल्ह्याचा विकास होतो. चंद्रपूर जिल्हा हा चिंतामुक्त व आनंदयुक्त व्हावा, यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावे, असे आवाहनही त्यांनी गावकऱ्यांना केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला हनुमान मंदिर परिसर सौंदर्यीकरणाचे लोकार्पण व नवीन पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन झाले, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घोषित केले.

### असे आहे हनुमान मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण

लखमापूर येथील हनुमान मंदिर परिसरातील संरक्षण भिंतीचे बांधकाम व परिसर सौंदर्यीकरणाच्या कामासाठी ग्रामीण विकास निधी अंतर्गत ६० लक्ष रुपये मंजूर करण्यात आले. यात व्यासपीठाचे बांधकाम, भित्तीचित्रे व मूर्ती कामासह सौंदर्यीकरण आणि वृक्ष लागवड यांचा समावेश आहे. साधारणत: १७० मीटर लांबीची व सरासरी २.२ मीटर उंचीची आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर एम-२५ दर्जाची संरक्षण भिंत पूर्ण करण्यात आली आहे. भिंतीकरिता फ्लॅश एश प्रकारच्या विटांचा वापर करण्यात आला असून भिंत ९ इंच जाडीची आहे. तसेच भिंतीला दोन्ही बाजूस ऍक्रेलिक इमुलशन पेंटने रंगरंगोटी करण्यात आली आहे. नैऋत्य दिशेला २७ स्क्वेअर मीटर क्षेत्रफळाचे व्यासपीठाचे बांधकाम करण्यात आले आहे. या मंदिर परिसरात आध्यात्मिक दर्शन करणारे एफ. आर. पी. प्रकारचे भित्तीचित्रे बनवण्यात आली असून संरक्षण भिंतीला लागून वृक्षलागवड सुद्धा करण्यात आली आहे.

## अष्टविनायक गणपती मंडळ महारखेड यांचा अनोखा उपक्रम

### वनश्री जनाबापु मेहेत्रे यांच्या हस्ते वृक्ष वाटप कार्यक्रमाचे आयोजन

**सिंदखेडराजा । प्रतिनिधी**

अष्टविनायक गणपती मंडळ महारखेड यांनी गणेशोत्सव विविध उपक्रांद्वारे साजरा करण्याचा निर्धार केला आहे.त्यातीलच एक भाग म्हणून २२ सप्टेंबरला वृक्ष वाटप कार्यक्रमाचे आयोजन वनश्री जनाबापु मेहेत्रे ,डॉ चौधरी व गावातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वनश्री जनाबापु मेहेत्रे ,डॉ चौधरी , गावातील सरपंच पती म्हसाजी वाघ, माजी सरपंच गजानन जायभाये, उपसरपंच निलेश घुले,उपसरपंच बद्रीभाऊ घुले, शासकीय ठेकेदार विलास देवरे, माजी सैनिक विष्णू घुले, तंटामुक्ती अध्यक्ष सर्जेराव नागरे, भाजपा तालुका अध्यक्ष गजानन घुले,प्रभाकर वाघ, संतोष लाड, गजानन सानप, रमेश देवरे, गजानन डोईफोडे,आन्नाजी जायभाये, विलास मेहेत्रे, संदिप वाघ, विलास वाघ, ज्ञानेश्वर ढाकणे,व गावातील इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## महाराष्ट्र नाभिक महामंडळाची विदर्भ पूर्व विभागीय कार्यकारिणी जाहिर

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ, विदर्भ (पूर्व) विभागाच्या विभागीय सभेचे आयोजन चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी येथे शनिवार दि.१६ सप्टेंबर २०२३ ला श्री केशवराव सूर्यवंशी यांचे निवास्थानी सभागृहात करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजसेवक केशव सूर्यवंशी होते.प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष बंडू राऊत तथा प्रदेश उपाध्यक्ष श्याम आस्करकर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांची मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळाची विदर्भ पूर्व विभागीय कार्यकारिणी व पदाधिकारी यांची निवड करून नियुक्ती करण्यात आली.नवनियुक्त कार्यकारिणीत अध्यक्ष - राजेंद्र इंगळे, कार्याध्यक्ष - नामदेव शेंडे, उपाध्यक्ष - मधुकर फुलबांधे,उपाध्यक्ष - प्रा. अशोक सालोटकर, नामदेवराव इझनकर, संघटन सचिव - मोहन निंबाळकर,प्रा. संदीप लांजेवार, संघटक- धनराज गुंडलवार, संघटक- पुरुषोत्तम राऊत यांचा समावेश आहे.या सभेला नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र फुलबांधे, जिल्हा उपाध्यक्ष राजू चिंचाळकर, जिल्हा कार्य सचिव विजय वालूकर, कौशल विकास प्रशिक्षक धरम अतकरे तथा ब्रम्हपुरी तालुका व चंद्रपूर जिल्ह्यातील पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन प्रा.अशोक सालोटकर, आभारप्रदर्शन सुनील मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रश्मी पगाडे, शालू फुलबांधे, रजनी सूर्यवंशी, प्रदीप मेश्राम, घनश्याम सूर्यवंशी, विनायक शेंडे, धनंजय पगाडे, विजय मेश्राम , नारायण लांजेवार यांनी परीश्रम घेतले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .